**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २४/०३/२०१७

## सिन्नर नागरी सहकारी पतसंस्था फसवणुक प्रकरणातील मुख्य आरोपी सुरज शहा यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गुजरात राज्यातुन केले जेरबंद

---

सिन्नर तालुक्यातील सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेचे सन २०१४ ते २०१६ लेखापरिक्षण अहवालात संस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, सरव्यवस्थापक व इतर कार्यकारणी यांनी संगनमत करून संस्थेतील विना-तारण कर्ज प्रकरणे, संस्थेचा कर्ज बोजा नोंद न केलेल्या मिळकती, कर्ज असतांना देखील देण्यात आलेले निल दाखले, संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर केलेले कर्ज वाटप, तसेच खोटे दस्तऐवज तयार करून संस्थेची व ठेवीदारांची **तब्बल ४३ कोटी ४८ लाख ४१ हजार ८२२ रूपयांची फसवणुक** केली म्हणुन सनदी लेखापाल अजय राठी, रा.नाशिक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **सिन्नर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि. नंबर १५०/२०१७** भादवि कलम ४२०,४६७,४६८,४७१,१२०(ब), ३४ सह महाराष्ट्र ठेवीरादरांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एम.पी.आय.डी.) चे कलम ३ व ४ प्रमाणे दिनांक २९ ऑगस्ट २०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सिन्नर नागरी पतसंस्थेत सामान्य नागरीकांनी अल्पबचत करून विश्वासाने आपल्या ठेवी ठेवल्या होत्या, मात्र ठेवीदारांना पतसंस्था परत पैसे देत नसुन फसवणुक केली जात असल्याचे समोर आले होते.

सदर गुन्हयात नागरीकांची मोठया प्रमाणात फसवणुक झाली असल्याने गुन्हयाचा पुढील तपास नाशिक ग्रामीण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेचे फसवणुक प्रकरणातील संचालक मंडळ, व्हा.चेअरमन, व्यवस्थापक, सरव्यवस्थापकांसह एकुण १३ जणांना वरील गुन्हयात यापुर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र, सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सुरज प्रकाश शहा, रा. शेटे गल्ली, सिन्नर, ता.सिन्नर हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सदर प्रकरणातील मुख्य आरोपीस अटक करणेसाठी तपास पथकास सुचना दिल्या होत्या. तसेच आरोपी सुरज शहा यांचा शोध घेणेसाठी सिमेलगतचे जिल्हे तसेच परराज्यात तपास पथके पाठविण्यात आली होती. गुन्हा घडल्यापासुन सुमारे ०७ महिन्यांपासुन सदर आरोपी हा आपले अस्तित्व लपवुन अज्ञात स्थळी निघुन गेला होता. दरम्यान गत काही दिवसांपासुन सदर आरोपीचे वास्तव्याबाबत उपयुक्त माहिती मिळालेवरून **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** व त्यांचे पथकाने सदर आरोपीचा शोध सुरू केला. पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांनी आरोपी सुरज शहा याचे नातेवाईक, मित्रमंडळी तसेच त्याचे परराज्यातील नातेवाईक यांचेबाबत उपयुक्त माहिती मिळवुन आरोपीचे सध्याचे वास्तव्याबाबत गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती घेतली. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुजरात राज्यात रवाना केले, दरम्यान दिनांक २३ मार्च रोजी मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे आरोपी सुरज शहा हा गुजरात राज्यातील गिरसोमनाथ जिल्हयात असल्याचे समजलेवरून स्थागुशाचे पथकाने त्यास अंजार, ता. ऊणा, जि.गिर-सोमनाथ येथुन एका जैन धर्मशाळेतुन ताब्यात घेतले आहे.

आरोपी सुरज शहा यांचे शोधार्थ रवाना करण्यात आलेले स्थागुशाचे पथक सुमारे ०८ दिवसांपासुन गुजरात राज्यात दबा धरून बसले होते, गुजरात राज्यातील विविध शहरे तसेच धार्मिक स्थळांवरील सुमारे २५० लॉजेस व धर्मशाळा तपासण्यात आल्या होत्या. आरोपी सुरज शहा हा गुन्हा घडल्यापासुन गुजरात, राजस्थान, दिव-दमन राज्यात आपले अस्तित्व लपवुन राहत होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथकाने अत्यंत चिकाटीने सदर आरोपीचा मागोवा घेवुन त्यास नाशिक पासुन सुमारे १३०० कि.मी अंतरावरील गुजरात व दिव-दमन राज्याचे सिमावर्ती भागातुन जिल्हा गिर-सोमनाथ येथील अंजार गावातील जैन धर्मशाळेतुन ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेला आरोपी **सुरज प्रकाश शहा, वय ४७, रा. शेटे गल्ली, सिन्नर, ता.सिन्नर** यास वरील गुन्हयाचे पुढील तपासकामी **आर्थिक गुन्हे शाखेचे ताब्यात देण्यात** आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे**, सहा.पोलीस निरीक्षक **श्री.आशिष आडसुळ,** पोना प्रितम लोखंडे, पोकॉ रविंद्र टर्ले, पोकॉ हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, चालक पोकॉ खांडेकर अशांचे पथकाने सदर आरोपीस ताब्यात घेऊन कामगिरी केली आहे.